# PUBLIC NOTICE

This Public Notice is hereby given to inform that the eligible Project Affected Farmers whose land has been acquired for Shendra (DMIC) project of Aurangabad Industrial Township Limited (DMIC) in the village Ladgaon and Karmad of Aurangabad Tehsil and District, the process for allotment of plots to the PAP's as per the Project Affected Policy 2021 of Aurangabad Industrial Township Limited has been initiated. Applications are invited from the eligible Project Affected Farmers in the prescribed form along with affidavit, heirship certificate of competent court in case of deceased farmers, consent of co-holders, copy of land acquisition award, current and the then 7/12 extract of the acquired land etc. on or before 26th July 2021 at the "AURIC Hall" office of the Aurangabad Industrial Township Limited, Shendra, Aurangabad. A Specimen copy(s) of these above mentioned documents are made available on the website of Aurangabad Industrial Township Limited i.e. **www.auric.city**. It is to be further noted that the process of plot allotment will be taken up immediately after scrutinizing the applications received till the last date mentioned above. For more information and details please contact to the office of Aurangabad Industrial Township Limited.

For **Aurangabad Industrial Township Limited**

Sd/-

**(Jitendra Kakuste)**

Joint Managing Director, AITL

Place: Andheri, Mumbai

Date: 11/07/2021

# जाहिर आवाहन

औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड (डीएमआयसी) च्या शेंद्रा प्रकल्पासाठी मौजे लाडगाव व करमाड, ता. व जि. औरंगाबाद येथील ज्या शेतकऱ्यांची जमिन संपादन करण्यात आलेली आहे अशा औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड (AITL) च्या पुनर्वसनविषयक धोरणानुसार पात्र ठरणाऱ्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला रकमेच्या दराने अनुज्ञेय होणारा भूखंड वाटप करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. पात्र प्रकल्पग्रस्त खातेदारांनी विहित नमुन्यातील अर्ज, शपथपत्र, मयत खातेदाराच्या बाबतीत सक्षम न्यायालयाचा वारस दाखला, सहधारकांचे संमतीपत्र, भुसंपादन दाखला, भुसंपादनाच्या वेळेचा ७/१२ उतारा व चालू ७/१२ उतारा इ. कागदपत्रांची पुर्तता दि. २६/०७/२०२१ पूर्वी औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेडच्या ''ऑरिक हॉल'' येथील कार्यालयात समक्ष दाखल करावीत. सदर कागदपत्रांचे नमुने औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेडच्या **www.auric.city** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेले आहे. उपरोक्त दिनांकापर्यंत प्राप्त प्रकरणांची छाननी करून भूखंड वाटपाची प्रक्रिया तात्काळ हाती घेणेत येणार आहे याची कृपया नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेडच्या ''ऑरिक हॉल'' येथील कार्यालयात संपर्क साधावा.

**(जितेंद्र काकुस्ते)**

**सह-व्यवस्थापकीय संचालक**

**(डीएमआयसी)**

**ठिकाण: अंधेरी, मुंबई**

**दि. ११/०७/२०२१**

# औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड (AITL)

**अर्जदाराचे नांव** : ____________________

**मोबाईल / दूरध्वनी क्र.** : ____________________

**पत्रव्यवहाराचे पत्ता** : ____________________

**दिनांक** : / / २०२१

**प्रति,**
**मा. व्यवस्थापकिय संचालक,**
औरंगाबाद, इंडस्ट्रीयल टाऊनशिप लिमिटेड,
**मुंबई.**

**विषय : औरंगोबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड च्या पुर्नवसन व पुर्नबहाली धोरणा नुसार शेद्रा औद्योगिक क्षेत्र (डीएमआयसी) करिता संपादीत जमिनीच्या औद्योगिक किंवा वाणिज्य वापराकरीता मोबदला दराने भुखंड मिळणेबाबत.**

महोदय,

वरील विषयी विनंतीपुर्वक अर्ज सादर करतो/करते की, माझे मालकीची मौजे- __________ तालुका _________ जि.__________ येथील शेत जमीन गट नं. __________क्षेत्र _________ हे. आर शेंद्रा औद्योगिक क्षेत्रासाठी भुसंपादन निवाडा क्रं. ________ दि. __________ अन्वये संपादीत झालेली आहे. सदर जमिनीचा ताबा संमतीने मी शासनास दि. ___________________ रोजी दिलेला असुन जमिनीचा मावेजा मला दि. _______________ रोजी मिळालेला असून औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशिप लिमिटेड च्या पुनर्वसन व पुनर्बहाली धोरण सन __________ अनुसार मला संपादीत जमिनीच्याः

(१) ______ **चौ.मी.** भुखंड औद्योगिक वापरासाठी, किंवा

(२) ______ **चौ.मी.** भुखंड वाणिज्य वापराकरिता

(दोन्ही पैकी एका पर्यायावर √ चिन्हांकित करावे )

विकसीत भुखंड / मोबदला मिळणेबाबत मी अर्ज करीत आहे. माझ्या शेतजमिनीचा भुसंपादनाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **गावाचे नांव** | **भुसंपादन निवाडयानुसार जमीन मालकाचे नाव** | **संपादीत जमिनीचा गट क्र.** | **संपादीत क्षेत्र (हे.आर)** | **अर्जदाराचा जमिन मालकाशी नातेसंबंध** |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

| ३ | | | | | |
|---|---|---|---|---|---|

(एकापेक्षा अधिक गटाची जमीन संपादन केली असल्यास सर्व गटांची माहिती एकत्रित देण्यात यावी.)

तरी आपणांस विनंती करतो/करते की, औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशिप लिमिटेड च्या पुनर्वसन व पुनर्बहाली धोरणानुसार मला औद्योगिक / वाणिज्य वापरासाठी मोबदला रक्कम अदा केल्यानंतर भुखंड मंजुर करण्यात यावा हि विनंती. अर्जासोबत मी पुढीलप्रमाणे कागदपत्र जोडत आहे.

१. शपथपत्र
२. मुळ जमिन मालकांचा मृत्यू झाला असल्यास मृत्युचा दाखला व सक्षम न्यायालयाचे वारसाचे प्रमाणपत्र. (आवश्यकतेप्रमाणे)
३. कुंटुबातील एकाच व्यक्ती नावे भुखंड पाहिजे असल्यास त्याचे नावे वाटप करणे बाबत १०० रु. च्या स्टॅप पेपरवर सहधारकांचे संमतीपत्र. (आवश्यकतेप्रमाणे)
४. भुसंपादन निवाडयाची साक्षांकित प्रत.
५. ताबा पावतीची साक्षांकित प्रत.
६. भुसंपादनाच्या वेळेचा ७/१२ उताऱ्याची प्रमाणित प्रत
७. भुसंपादित गटाचा चालु ७/१२ उतारा

**आपला विश्वासु,**

**( )**

# <u>संमतीपत्र</u>

**(रु. १०० चे स्टँप पेपर वर नोटरी पब्लिक यांचे समोर करावयाचे)**

आम्ही खालील स्वाक्षरी करणारे भुसंपादित जमिनीचे कायदेशीर मालक / वारस संमतीपत्र लिहून देतो कि मौजे ______ तालुका _______ जिल्हा औरंगाबाद येथील गट क्रमांक ______ मधील क्षेत्र _____ हे. आर आम्ही सहधारकांच्या नांवे / आमचे वडील / आई नाव_________________ यांचे नांवे म. औ. वि. महामंडळाने भुसंपादन करण्यात आलेली आहे. संपादित जमिनीच्या **प्रमाणात देय होणारे** औद्योगिक किंवा **वाणिज्य** प्रयोजनासाठी औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड च्या धोरणानुसार भुखंड वाटप करताना आम्हा सहधारकापैकी श्री.______________________ यांचे नावे भुखंड वाटपासाठी संमती देत आहोत. सदर भुखंडामध्ये आमचा समान हक्क राहील. येणेप्रमाणे समंतीपत्र मी / आम्ही आमचे राजीखुशीने, अक्कल हूशारीने, नशापाणी न करता कोणाच्याही दडपणास बळी न पडता महामंडळाचा / औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड कडून भुखंड परतावा मिळण्यासाठी लिहून दिले असून ते आमच्यावर, आमचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील. सदर संमतीपत्रातील कोणत्याही बाबीची पुर्तता न झाल्यास तसेच महामंडळाच्या / औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड च्या नियमाचे पालन न झाल्यास होणा-या सर्व कायदेशीर कार्यवाहीस मी / आम्ही जबाबदार राहू. त्याकरिता माझ्या / आमच्या / सह्या / अंगठे आज रोजी केले आहे.

**स्थळ :** मौजे__________ **तालुका :** _________ **जिल्हा :** _________

**दिनांक :** ________

संमती पत्र करून घेणार :

संमती देणारे सर्व वारसांची / सहधारकांची सही व नावे

१ सही ____________
नाव

फोटो

२ सही ____________
नाव

फोटो

# शपथपत्र

**(रु. १०० चे स्टँप पेपर वर नोटरी पब्लिक यांचे समोर करावयाचे)**

कारणे शपथपत्र लिहून देतो की, माझे / आमचे मौजे________ तालुका ________ जिल्हा औरंगाबाद येथील गट क्रमांक ________ मधील क्षेत्र ________ हे. आर हे औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड च्या शेंद्रा औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार संपादित होऊन शासनाकडे संपूर्णपणे निहित झालेले आहे. सदर क्षेत्रासाठी आम्ही सर्व संमतीने म.औ.वि. महामंडळाशी करारनामा करून मोबदला रक्कम स्विकारलेली आहे. सदर संपादित क्षेत्रासाठी मला / आम्हाला महामंडळाच्या नियमानुसार **देय होणारे** औद्योगिक अथवा वाणिज्य परतावा क्षेत्र मोबदला दराने वाटप करण्यात यावे यासाठी खालीलप्रमाणे शपथपत्र लिहून देत आहे.

१. सदर गटामध्ये आमची खालीलप्रमाणे हिस्सेवारी असून त्याप्रमाणे खालील **प्रमाणे येणारे** औद्योगिक अथवा वाणिज्य परतावा क्षेत्र सर्व संबंधितांना मान्य आहे.

| **अ.क्र** | **गावाचे नांव** | **भुसंपादन निवाडा क्र. व दि.** | **ग.क्र** | **संपादित क्षेत्र (हे.आर)** | **भुसंपादन निवाडयानुसार खातेदारचे नांव** | **अर्जदाराचा मूळ खातेदाराशी नातेसबंध** | **औद्योगिक अथवा वाणिज्य परतावा क्षेत्र (चौ.मी)** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

२. औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड पुनर्वसन विषयक धारेण आम्हाला मान्य आहे.

३. सदर परतावा क्षेत्र मी / आम्ही या पुर्वी कधीही घेतले नसून प्रथमच त्या संदर्भात मागणी कलेली आहे. त्याचप्रमाणे सदर परताव्याबाबत पुन्हा कधीही नव्याने मागणी करणार नाही.

४. सदर परतावा क्षेत्राशी संबंधित सर्व हितसंबधीची संमती प्राप्त करून परतावा मागणी केली आहे.

५. संबंधित देकार किंवा वाटप प्रक्रियेनंतर विवाद उद्भवल्यास त्यासाठी मी / आम्ही जबाबदार राहू अशी हमी देतो.

६. परतावा क्षेत्रासंदर्भात आज रोजी कोणताही न्यायालयीन दावा प्रलंबित नाही. तसेच म.औ.वि. महामंडळा विरूद्ध वाढीव मोबदल्यासाठी कोणताही दावा / विवाद भविष्यात करणार नाही. याचीही मी /आम्ही हमी देत आहोत.

७. औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप च्या नियमानुसार तसेच करारनाम्याच्या अटीनूसार वाटप भुखंडावर बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेणार आहोत.

८. संपादित गटात असणा-या घर, गोठा, शेड, झाडे, विहिर, पाईप लाईन इ. मालमत्तेच्या मुल्यांकनासहित मला / आम्हाला नुकसान भरपाई मिळालेली आहे व सदर जागेवर आता माझा / आमचा कोणताही अधिकार राहिलेला नाही, याची मला / आम्हाला कल्पना आहे.

९. संपादित गटात असलेल्या भुखंड / रस्ते इत्यादींच्या विकास कामात अडथळा आणणार नाही तसेच संपादित क्षेत्राच्या हद्दी समजूतीने निश्चित करू व महामंडळास/ एआयटीएल ला सहकार्य करू याची मी / आम्ही हमी देत आहोत.

१०. औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड पुनर्वसन विषयक धोरणानुसार मला / आम्हाला मिळणार भुखंड औद्योगिक अथवा वाणिज्य परतावा क्षेत्र विशिष्ट ठिकाणीच देण्याबाबत आग्रह करणार नाही.

येणेप्रमाणे शपथपत्र मी / आम्ही आमचे राजीखुशीने, अक्कल हूशारीने, नशापाणी न करता कोणाच्याही दडपणास बळी न पडता औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड चा परतावा भुखंड मिळण्यासाठी लिहून दिले असून ते आमच्यावर व आमचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील. सदर हमीपत्र / शपथपत्रातील कोणत्याही बाबीची पुर्तता न झाल्यास औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशीप लिमिटेड तसेच म.औ.वि. महामंडळाच्या नियमाचे पालन न झाल्यास तसेच शपथपत्रातील मजकूर खोटा आढळून आल्यास भा.दं.वि. कलम _______ नुसार मी / आम्ही शिक्षेस पात्र राहू व त्यापुढील होणा-या सर्व कायदेशीर कार्यवाहीस मी / आम्ही जबाबदार राहू याची हमी देत आहोत. त्याकरिता माझ्या / आमच्या / सह्या / अंगठे आज रोजी केले आहे.

**स्थळ :** मौजे__________ तालुका : _________ जिल्हा :_________

**दिनांक :** ________

| **साक्षीदार** | **शपथ लिहून देणार** |
|---|---|
| १ सही ____________ | १ सही ____________ |

नाव

पत्ता

फोटो

नाव

पत्ता

फोटो

२ सही ____________

नाव

पत्ता

फोटो

२ सही ____________

नाव

पत्ता

फोटो